सांकेतांक क्र 198812262 2

परिपत्रक
=======

क्रमांक/- कॉन/एलआर १२७/क-१/८८

पुणे, दिनांक २५-१२-१९८८

विषय:- जमीन एकत्रीकरण योजना

तक्रारी अर्ज चौकशी संबंधात कायदा कलम ३१[अ] व कायदा कलम ३२[१] अन्वये करावयाची कार्यपध्दती..

या कार्यालयाकडील क्रमांक [१] कॉन/एलआर १२७/७८/ दिनांक-१२-४-७८[२] कॉन एलआर/दु.योजना/८० दिनांक २१-४-८०,व [३] कॉन /एलआर १२७/सी-१/८६ दिनांक ६-२-८६ च्या परिपत्राकान्वये विषयांकित सूचना रद्द समजणेच्या असून, तक्रारी अर्ज चौकशी संबंधात करावयाच्या कार्यवाहीबाबत, तसेच कायदा कलम ३१[अ] आणि कायदा कलम ३२[१] अन्वये करावयाच्या दुरुस्तीबाबत कोणत्या कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा यासंबंधी खालील प्रमाणे सविस्तर सूचना देण्यात येत आहेत.

१] अधिकार अभिलेखा:-
=================

१] एकत्रीकरण योजनेचेवेळी फेरफाराच्या नोंदी ह्या भूमि अभिलेखा खात्यातील कर्मचारी/अधिकारी यांचेकडून घालण्यात येतात/मंजूर करण्यात येतात. अशा नोंदी विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जावर एकत्रीकरण अधिकारी/ विशेष अधिक्षक भूमि अभिलेख व एकत्रीकरण अधिकारी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २४७ अन्वये अपील चालवून निर्णय द्यावा.

२] अपील निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अनेक खात्यात कब्जेदाराचे नांवात दुरुस्ती होत असेल अगर संपूर्ण गटावरील नांवात बदल होत असेल तर गटाचे अधिकार अभिलेखातील "६ड" यांत सरळ नोंद घेऊन ७/१२ दुरुस्त करावा. व तसा शेरा एकत्रीकरण योजनेतील संबंधित खात्यातील बाधित गटासमोर ठेवावा.

३] जर अपील निर्णयानुसार गटाचे विभाजन होत असेल तर अशा विभाजनामुळे नकाशा व योजना यांमध्ये दुरुस्ती होत असलेने अशा प्रकरणी का. कलम ३१[अ] अन्वये शुध्दीपत्रक करणेत यावे.

पान-२वर

४] मूळ भूमि अभिलेख किंवा फाळणी मोजणीचे अभिलेखावरून क्षेत्र आकार आणि गांवचे अधिकार अभिलेखावरून नांवे /अंतिर हक्क, हस्तदोषाने अगर नजरचुकीने एकत्रीकरण योजनेत घेताना चूक झाली असेल आणि अशी चूक एक किंवा अनेक खात्यांत झाली असेल तर अशा सर्व प्रकरणी कायदा कलम-३१[अ] अन्वये शुध्दीपत्रक करणेची कार्यवाही करणेत यावी.

२] पोटहिस्सा मोजणी:-

१] एकत्रीकरण योजनेपूर्वी/अगर योजनेचेवेळी झालेल्या पोटहिस्सा मोजणीप्रमाणे योजनेंत सर्व जमीनी/हिस्से मूळ प्रमाणे कायम ठेवले असतील आणि ही मोजणी चुकीची आढळून आल्यास,प्रत्यक्ष जागेवरील वहिवाटीप्रमाणे पोटहिस्सा मोजणी फलकयंत्राने खालील शर्ती विचारांत घेऊन करणेंत यावी.

अ] पोटहिस्सा मोजणी सर्व संबधीत खातेदार यांचे उपस्थित करणेंत यावी व त्यांचे स्पष्ट जबाब नोंदवावेत.

ब] मोजणीत प्रत्यक्ष वहिवाटीनुसार येणारे क्षेत्र सर्व संबंधितांना रजिस्टर पोष्टानें कळवावे व पोहोंच पावती प्रकरणांत सामील करावी.

क] वहिवाटी प्रमाणे केलेली मोजणी सर्व संमत असेल तर निमतानदार यांचेकडून सदर कामाची तपासणी करून घेणेत यावी व त्या अनुषंगाने कायदा-कलम ३१[अ] अन्वये दुरूस्त करणेंत यावी.

ड] प्रत्यक्ष जागेवरील वहिवाटीप्रमाणे केलेली मोजणी एखाद्या खातेदारास मान्य नसलेस अगर वहिवाटी प्रमाणे क्षेत्र कब्जेदारास कळविलेनंतर तक्रार उद्‌भवलेस सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी स्वत: अशा प्रकरणी पोटहिस्सा मोजणी कामाची तपासणी फलकयंत्रानेच करून हि.फॉ.नं.२ मध्ये निर्णय देऊन कायदा कलम ३१[अ] अन्वये शुध्दीपत्रक करणेची कारवाई करावी.

वरील सर्व बाबींची यथायोग्य पूर्तता करून नवीन पोटहिस्सा मोजणी प्रमाणे कायदा कलम ३१[अ] अन्वये शुध्दीपत्रक करण्यांत यावे.

२/- शुध्दीपत्रक मंजूर होतांच ते नियमानुसार प्रसिध्द करण्यांत यावे. प्रसिध्दीची ६५ दिवसांची मुदत संपताच मंजूर शुध्दीपत्रकाची नोंद गा.न.नं.६ यांत घेऊन सदर नोंद लगेच मंजूर करून त्या अनुषंगाने संबंधित अधिकार अभिलेख दुरूस्त करणे यावे. यासाठी विलंब लावू नये.

३/- अपील निर्णयामुळे योजनेंत झालेल्या गटबांधणीत फेरबदल होत असेल तर अपील निर्णयाप्रमाणे कायदा कलम ३२[१] अन्वये दुरूस्ती योजना तयार करावी.
त्या

पान-३ पर

S-88

१४ ३ ११

त्याचप्रमाणे योजनेपूर्वी अगर योजनेचेवेळी पोटहिस्सा मोजणीमध्ये गटबांधणी झाली असेल आणि नवीन करणेत आलेल्या पोटहिस्सा मोजणीमुळे झालेल्या गटबांधणीत फेरबदल होत असेल अगर करावा लागत असेल तर अशा प्रकरणी कलम ३२[१] अन्वये दुरुस्ती योजना करणेत यावी आणि इतर सर्व अदला बदली बाबतच्या तक्रारी अर्जाचे प्रकरणी विहित नमुन्यात जबाब नोंदवून घेऊन त्या अनुषंगाने कायदा कलम ३२[१] अन्वये दुरुस्ती योजना तयार करणेत यावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी ताबडतोब करणेची आहे. तथापी या कार्यालयाकडून यापूर्वी दुरुस्ती योजना तयार करणेबाबत अगर दुरुस्त योजने प्रसिध्दीबाबतचे आदेश देणेत आले असतील अशा प्रकरणी कायदा कलम ३२[१] अन्वयेच पुढील कार्यवाही करणेत यावी.

तक्रारी अर्ज प्रकरणांचा निपटारा जलदगतीने व्हावा व अर्जदाराचे तक्रारीचे अंतिमरित्या निर्मूलन त्वरीत व्हावे या दृष्टीने वरील सूचना दिलेल्या आहेत. तरी उपसंचालक भूमि अभिलेख यांनी वरील सूचनेनुसार प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करणेची कार्यवाही करावी.

सही/-[ अ. ना. बटव्याळ ]

जमाबंदी आयुक्त आणि संचालक

भूमि अभिलेख [म. राज्य] पुणे

प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व ] यांचेकडे माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित.

प्रत:- एकत्रीकरण अधिकारी, विशेष अधिक्षक भूमि अभिलेख/अधिक्षक भूमि अभिलेख [सर्व] यांना माहिती व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत:- सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी[सर्व] यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत:- कार्यासन अधिकारी, क-१ ते ७ , जमाबंदी आयुक्त पुणे कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.

" निर्गमित "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त,

[सर्वसाधारण] पुणे.